# विधी अधिकारी (कंत्राटी पध्दतीने) पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांना आवश्यक सुचना

१) शासन, महसूल व वन विभाग यांचे निर्णय क्र. ईएसटी-२०१३/प्र.क्र.१७३/ई-८, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१३ मधील तरतुदीनुसार विधी अधिकारी हे पद कंत्राटी पध्दतीने एकावेळी ११ महिन्याच्या कालावधीच्या मर्यादेत भरावयाचे असून त्याकरीता दिनांक ०२ मार्च, २०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

२) अर्जदाराने अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व कागदपत्रे व प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

३) दिनांक ०२ मार्च, २०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या अर्जाची दिनांक ०९ मार्च, २०२० पर्यंत छाननी करून दिनांक ०९ मार्च, २०२० रोजी http://nagpur.nic.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

४) उमेदवारांचे प्रविण्य पडताळणी आवश्यकता वाटल्यास लेखी चाचणी अथवा प्रत्यक्ष मुलाखत (तोंडी) घेण्यात येईल. याबाबतची सुचना दिनांक ११ मार्च, २०२० रोजी संकेतस्थळावर तसेच कार्यालयाचे सुचना फलकावर लावून प्रसिध्द करण्यात येईल.

५) अंतिम निवड झालेल्या उमेदवाराचे नाव यथवकाश कार्यालयाचे सुचना फलकावर तसेच संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

६) निवड झालेल्या उमेदवाराने विहीत नमुन्यातील करारनामा करून देणे बंधनकारक आहे. काररनामा करून दिल्यानंतर निवड झालेल्या उमेदवारास कंत्राटी पध्दतीने नेमणूक करीत असल्याचे आदेश देण्यात येतील.

७) कंत्राटी पध्दतीने विधी अधिकारी या पदावर नेमणूक झालेल्या उमेदवारास त्यांचे नेमणुकीचे पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडव्या लागतील.

८) या प्रक्रीयेमध्ये बदल करण्याचा अथवा स्थगीत / रद्द करण्याचा अधिकार विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, विभागीय निवड समिती यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.